International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.688
Volume 4, Issue 4, Oct-Dec 2024 ID: IJCRTA0000182 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# मराठवाड्याच्या विकासासमोरील आव्हाने

**नितीन रामकिशनराव भुताळे* & प्रा. डॉ. माधव माणिकराव चोले****

**Author Affiliation:**
*संशोधक, राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर, ई-मेल: nbhutale@gmail.com
**संशोधन मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर,

**Citation of Article**: भुताळे, एन. आर., & चोले, एम. एम. (2024). मराठवाड्याच्या विकासासमोरील आव्हाने. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 4 (4), pg. 106-111. ijcrta.org

**DOI:** 10.5281/zenodo.15287374

**प्रस्तावना:**

01 मे 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठी भाषिक लोकांचे राजकीय ऐक्य प्रस्थापित झाले. प्रथमच सर्व मराठी भाषिक जनता व प्रदेश एका राज्याच्या क्षेत्राखाली आला. तत्पूर्वी 01 नोव्हेंबर 1956 रोजी स्थापन झालेल्या द्विभाषिक मुंबई राज्यात मध्य प्रांतातील विदर्भ आणि हैदराबाद राज्यातून मराठवाडा हे मराठी भाषिक प्रदेश समाविष्ट करण्यात आले होते. मराठवाडा ही संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत गोरा कुंभार अशा संतांची भूमी म्हणून ओळख आहे. सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, यादव या सम्राटांनी मराठवाड्याच्या भूमीवर राज्य केले आहे. वाकाटक राजवटीमध्ये जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांची निर्मिती झाली होती. राष्ट्रकुटांच्या काळात कैलास लेण्यांची निर्मिती करण्यात आली होती. इसवी सन पूर्व 230 ते इसवी सन 1340 पर्यंत जवळजवळ 1570 वर्ष मराठवाडा वैभवशाली कालखंडात जीवन जगत होता. सन 1347 पासून मराठवाड्यावर अहिल्यानगरच्या (अहमदनगर) बहामनशहाचे राज्य स्थापन झाले होते. सन 1634 पासून शहाजहान आणि औरंगजेब, तर 1728 पासून 17 सप्टेंबर 1948 पर्यंत हैदराबादच्या निझामाने मराठवाड्यावर राज्य केले होते. या सर्वांच्या राजवटीमध्ये मराठवाड्यातील जनतेची सर्व बाजूंनी गळचेपी व अन्याय चालूच होता. या सर्वांच्या राजवटीमध्ये रस्ता, वीज, रेल्वे, शिक्षण, आरोग्य, उद्योग यासारख्या पायाभूत सुविधा पासून मराठवाड्याला जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले होते. 1948 नंतर जनतेची उदासीनता आणि राजकीय नेत्यांची निष्क्रियता असे समीकरण मराठवाड्याचे बनले होते. मराठवाड्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासाच्या आव्हानांमध्ये अनेक मुद्दे पुढे आले आहेत. त्यात शिक्षण, नोकरी, आरोग्य, सिंचन, सहकार उद्योग पायाभूत सुविधेपासून मराठवाडा विकासापासून वंचित राहिलेला आहे.

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.688
Volume 4, Issue 4, Oct-Dec 2024 ID: IJCRTA0000182 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

मराठवाडा विभाग राज्यात समाविष्ट होताना कोणतीही अट न टाकता तत्कालीन मुंबई राज्यात विलीन झाला होता. मराठवाड्याच्या विकासा संदर्भात कोणत्याही स्वरूपाचा अन्याय होऊ दिला जाणार नाही. उलट त्यांच्या विकासासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात विकास अनुदान, शैक्षणिक सुविधा व नोकऱ्या दिल्या जातील असे आश्वासन तत्कालीन नेतृत्वाने दिले होते. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्याने मराठवाड्यात भावनिक मनोमिलन कसे घडविता येईल यावर भर यशवंतराव चव्हाण यांनी दिला होता. महाराष्ट्र राज्यात मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या प्रादेशिक विभागातील नागरिकांच्या भाषा व संस्कृती समान असली तरी प्रशासकीय दृष्ट्या हा प्रदेश प्रदीर्घकाळ परस्परांपासून विभक्त होता. त्यामुळे या प्रदेशात शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासात बराच फरक होता. त्यांची परिनिती मराठवाडा या प्रदेशात आर्थिक विकासात असमतोलात भर पडली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठवाड्यातील आर्थिक विकासातील असमतोलाची दरी दूर होणे आवश्यक होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर मराठवाड्याच्या विकासाला प्राधान्य देण्यासाठी विशेष लक्ष देण्यात येऊ लागले. मराठवाड्यासाठी त्यांच्या नेतृत्वात औरंगाबाद येथे मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ स्थापन करण्यात आले व मराठवाडा कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. औद्योगिक विकासाला चालना देण्यात येऊ लागली. मराठवाड्यात व्यवसायिक शिक्षणाच्या सुविधावर भर देण्यात येऊ लागले. दुर्दैवाने शासनाचे हे प्रयत्न मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील विकासाची दरी दूर करण्यात अपुरे ठरत होते. मराठवाडा इतर प्रदेशाच्या तुलनेत विकासाच्या बाबतीत खूप मागे राहिला दळणवळण, कृषी, सिंचन सुविधा, उद्योग आणि शिक्षण याबाबत मराठवाड्यांचे मागासलेपण पुढे आले. पर्यायाने राज्याच्या विकासात प्रादेशिक असमतोल निर्माण झाला. मराठवाड्याच्या राजकीय नेतृत्वावर दोष ठेवून अविश्वासाची भावना वाढीस लागली होती, त्यासाठी मराठवाड्याचे विकासातील आव्हाने समजून घेण्यासाठी खालील मुद्दे स्पष्ट करण्यात येतात.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मराठवाड्याच्या विकासासामोरील आव्हाने – आर्थिक मागासलेपणा, बेकारी, वाढते दारिद्र, सहकार क्षेत्र, पायाभूत सुविधा, आणि जल सिंचन यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला असून, तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा पाक्षिक, मासिक, विशेषलेख संदर्भग्रंथांचा वापर करण्यात आला आहे.

**मराठवाड्याच्या विकाससमोरील आव्हाने:**

महाराष्ट्र हे कृषी प्रधान राज्य आहे. अलीकडील काळात राज्यात झालेल्या औद्योगिक प्रगतीने अर्थव्यवस्थेचे वर्णन कृषी औद्योगिक अर्थव्यवस्था असे केले जाते. परंतु या कृषी औद्योगिक अर्थव्यवस्थेमधील महत्त्वाचा घटक म्हणून मराठवाड्याकडे पाहिले जाते. मराठवाड्याच्या विकासाला चालना देणारा निर्णय प्रक्रियेचा अभाव दिसून येतो. म्हणून खालील मुद्द्याच्या आधारे अभ्यास करण्यात आलेला आहे.

**१. आर्थिक मागासलेपणा:** मराठवाडा हा कृषीप्रधान प्रदेश असला तरी औद्योगिकदृष्ट्या मागास आहे. मराठवाड्यात सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणामुळे जातीय ताण-तणाव आणि हिंसाचार होतो. 'मराठवाडा हा सर्वाधिक जातीय

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.688
Volume 4, Issue 4, Oct-Dec 2024 ID: IJCRTA0000182 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

ताण-तणाव व हिंसाचार अनुभवास येणारा प्रदेश आहे. अटीतटीच्या काळात हा तणाव अधिक तीव्र रूप धारण करतो. अशा ताणतणावाच्या मुळाशी खोलवर रुजलेले मराठवाड्यांचे सामाजिक व आर्थिक मागासलेपण दडलेले आहे. ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालील प्रदेशात ज्याप्रमाणे आधुनिकतेची मूल्य, संचार साधने, दळणवळणाची मार्ग, औद्योगिकरण आणि शिक्षणाचे वारे (शिक्षण संस्था) होते ते मराठवाड्यात खूप उशिरा पोहोचले. इतर सुविधांचा अभाव होता. शेतीपूरक धोरणांचा आणि औद्योगिक विकासाचा मागमुसही नव्हता. निझामाच्या पाडावा नंतर मराठवाडा विभाग विनाअट संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला. मात्र निजामी राजवटीचे अवशेष मात्र शिल्लक राहिले. जमीन सुधारणा, हरितक्रांती, शेती विकास, पीक पद्धतीतील नियोजन, पाणीसाठा नियोजन, नैसर्गिक साधन संपत्ती, औद्योगिक विकास या सर्व घटकांचा अभाव आहे. याशिवाय सर्वात महत्त्वाचा म्हणजे पाणीटंचाई मुक्त करणे आणि मजुरांचे रोजगारांच्या अभावी स्थलांतर कसे थांबवता येईल हे होय. मराठवाड्यात सातत्याने दुष्काळ पडत असल्यामुळे पूर्ण विभाग, विशेषतः ग्रामीण भाग आर्थिक मागासलेपणाच्या वाटेवर चालला आहे. शेतकऱ्याच्या वाढत्या आत्महत्या, घटलेली शेती उत्पादकता, कमी पाऊस, रोजगाराच्या अपुऱ्यासंधी यामुळे बँकिंग सेक्टरवर मोठा परिणाम झाल्याचे सांगत केंद्रीय वित्त आयोगाच्या बैठकीत चिंताव्यक्त करण्यात आली होती. मराठवाड्याच्या विकास प्रश्न सोडवण्यासाठी मराठवाडा वैज्ञानिक विकास महामंडळ स्थापन झाले. या महामंडळाला आर्थिक निधीच्या तरतुदी अभावी प्रभाविपणे विकासाचा प्रश्न सोडवण्यासाठी उतरता आले नाही. केवळ बैठका, मागासलेपणाचा आढावा, प्रशासकीय नेमणुका आणि कामकाज या भूमिकेतून प्रत्यक्ष व्यावहारिक पातळीवर हे महामंडळ आले नाही. त्यामुळे हे महामंडळ आता विकासासाठी स्वप्नाळू संस्था म्हणून मराठवाड्यात कार्यरत आहे. परमिट राजच्या जमान्यात सरकार उद्योजकांना अविकसित भागात उद्योग उभारण्यास सांगू शकत होते, पण आता उदारीकरण्याच्या जमान्यात कोणताही उद्योजक मराठवाड्यासारख्या अविकसित भागात उद्योग उभारायला तयार नाही. उद्योगासाठी गरजेची असलेली सप्लाय चेन ही मराठवाड्यात नाही. त्याचबरोबर खाजगी कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना राहण्यासाठी उत्तम व्यवस्था, उत्तम शिक्षण व्यवस्था, रस्ते, वीज यांचीही मराठवाड्यात अजूनही भ्रांत आहे.

**२. सहकार क्षेत्र:** राज्यात सहकारी चळवळीने जी लक्षणीय प्रगती केली आहे, त्यात नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेला कृषी औद्योगिक अर्थव्यवस्था असे नामकरण प्राप्त करून देण्यात येथील सहकारी उद्योगाचा महत्त्वाचा वाटा आहे. यशवंतराव चव्हाण यांनी सहकारी चळवळीला अर्थसहाय्य व कायदेशीर मदत देऊन प्रोत्साहन दिले. त्यामुळे राज्यात सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका व इतर सहकारी संस्थांची भरभराट झाली. या उद्योगांनी राज्याच्या आर्थिक विकासाला चालना दिली. परंतु मराठवाड्यात सहकार चळवळ चांगल्या प्रकारे रुजली नाही. याचे मुख्य कारण म्हणजे चांगल्या नेतृत्वाचा अभाव होय. उत्तम व्यवस्थापन कौशल्य असलेले लोकही मराठवाड्याला लाभले नाहीत किंवा त्यांना काम करण्याची मोकळीक दिली गेली नाही. सहकारी साखर कारखाने, गिरण्या तोट्यात असल्याने ते बाजारभावापेक्षा कमी किंमतीत विकण्यात आले. तेच कारखाने किंवा गिरण्या खाजगी व्यक्तीकडे गेल्या की नफा कमवू लागतात असेच चित्र सहकार क्षेत्रात मराठवाड्यात आढळून येते.

**३. बेकारी व वाढते दारिद्र्य:** मराठवाड्यात बेकारी व वाढते दारिद्र्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रातील मागासलेपणा व कोरडवाहू शेतीचे अधिक प्रमाण दारिद्र्याला चालना देते. शेती उत्पादनातील चढ-उतार, कायम रोजगाराचा अभाव, छुपी बेकारी इत्यादीने शेतकरी त्रस्त झाला आहे. कर्जबाजारी शेतकरी होत आहेत, कर्जाला कंटाळून आत्महत्या सारखे मार्ग अवलंबत आहेत. महाराष्ट्र शासनाने दारिद्र्य आणि बेकारीवर उपाय योजनेसाठी रोजगार हमी योजना सुरू केली आहे. बेकारांना बेकार भत्ता देण्याची बाब विचाराधीन आहे. कर्जमाफी योजना सुद्धा शासन पातळीवर राबविण्यात आली आहे. हे सर्व उपाय तात्पुरते व वरवरचे आहेत. दुसऱ्या बाजूला रोजगारासाठी ग्रामीण लोकांचे शहराकडे स्थलांतर होत आहेत. नागरी सुविधावर ताण निर्माण होत असून शहरे झोपडपट्ट्यांच्या ओझ्याखाली वाकत आहेत. समाजात बेकारी, दारिद्र्य व उपासमारीने असंतोष वाढत असून युवक हिंसक मार्गाकडे आकर्षित होत आहेत.

**४. पायाभूत सुविधा:** पायाभूत सुविधांच्या आधारे कोणत्याही प्रदेशाचा आर्थिक विकास समजला जातो. मराठवाड्यातील पायाभूत सुविधांसाठी दळणवळणाच्या सोयी, संदेशवहन, वीज पुरवठा, पाण्याची उपलब्धता इत्यादी बाबींचा समावेश केला जातो. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून आता २०२५ पर्यंत प्रत्येक निवडणुकीला (लोकसभा व विधानसभा) मराठवाड्याच्या विकासाला पायाभूत सुविधांची उपलब्धता केली जाणार असा प्रत्येक पक्ष आश्वासन देतो. मराठवाड्यातील रेल्वे मार्गाची लांबी ही दर हजार चौरस कि.मी. मागे १३३.३१ आहे. महाराष्ट्राची ही सरासरी १७६.५४ कि.मी. आहे. याचा अर्थ विभागातील रेल्वे मार्गाची लांबी मुळातच कमी असून त्यातील बहुतांश मार्ग मीटरगेज व नॅरोगेज होते. २००९ नंतर त्यांचे ब्रॉडगेज मध्ये रूपांतर करण्यात आले आहे. मराठवाड्यातील रस्त्यांची लांबी राज्याच्या सरासरी एवढी असली तरी आताच्या परिस्थितीत महामार्गाची कमतरता मोठ्या प्रमाणात आहे. मराठवाड्यातील भागांचा विकास कमी झाला आहे. रस्ता आणि पाणीपुरवठा यासारख्या पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मराठवाड्याच्या विकासाला अडथळा येतो. मराठवाड्यात हवाई वाहतुकीबाबत छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर ही शहरे वगळता उर्वरित जिल्हे या सुविधांपासून वंचित आहेत. मराठवाड्याच्या विकासासमोरील आव्हानांमध्ये उद्योग आणि व्यवसायांना अडथळा, आरोग्य सुविधांचा अभाव, शिक्षण आणि शिक्षणाची गुणवत्ता कमी इत्यादी पायाभूत सुविधा शासकीय पातळीवर निर्णयाची उपेक्षा करतात.

**५. जलसिंचन:** मराठवाड्याच्या विकासासमोरील आव्हानांमध्ये जलसिंचन हा एक महत्त्वाचा विषय आहे. शेतीचा विकास साध्य करण्यासाठी जलसिंचन सुविधांना असाधारण असे महत्त्व आहे. मराठवाड्यातील जवळजवळ ८० टक्के लोक शेती व शेतीशी निगडित व्यवसायावर उदरनिर्वाह चालतो. मराठवाड्यातील शेतीचे भवितव्य निसर्गाच्या लहरीवर विसंबलेले आहे. जलसिंचनाच्या पुरेसा सुविधा अभावी हा विभाग सातत्याने आवर्षणप्रवण असतो. मराठवाड्यातील ४४ तालुके कायम आवर्षणप्रवण आहेत. मराठवाड्यामध्ये एकूण सिंचन ते स्थूलपिक क्षेत्राची टक्केवारी लातूर जिल्ह्यात १२.७२% प्रति वर्ष आणि नांदेड जिल्ह्यात ०९.३४% वार्षिक आहे. जालना जिल्ह्यात एकूण सिंचन ते सकल पीक क्षेत्राची टक्केवारी १.८९% कमी आहे. मराठवाडा विभागातील जलसिंचनाची सरासरी पश्चिम महाराष्ट्रापेक्षा कमी आहे.

राज्यातील चालू सिंचन प्रकल्प व भविष्यकाळातील सिंचन विषयक अनुशेष १३३८ कोटी रुपयांचा असून त्यापैकी कोकण, मराठवाडा आणि विदर्भ विभागांचा अनुशेष ६९ टक्के म्हणजे ९५० कोटी रुपयांचा आहे. १९९८ मध्ये महाराष्ट्र सरकारने मराठवाड्यातील पाटबंधारे विकासासाठी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ स्थापन करून २६४ पाटबंधारे प्रकल्प हाती घेऊन पूर्णत्वास झाले आहे. शेतीपूरक जोडधंदांचा अभाव व सेवा क्षेत्रांच्या मर्यादित वाढीने शेतीवरील लोकसंख्यांचा बोजा वाढला आहे. परिणामी मराठवाड्याच्या विकासाला आव्हान आहे. मराठवाडा कायम स्वरूपात दुष्काळा सामोरे जाणारा प्रदेश आहे.

**निष्कर्ष:**

१. मराठवाड्यात सातत्याने दुष्काळ, सिंचनाचा अनुशेष, उद्योगांची कमतरता, अपुरी वैद्यकीय सुविधा, दर्जाहीन शैक्षणिक सुविधा या साऱ्या आव्हानांशी सामना नागरिकांना करावा लागतो.

२. मराठवाडा हा कृषीप्रधान असला तरी औद्योगिकदृष्ट्या मागास आहे. मराठवाड्यासमोर पायाभूत सेवांचा विस्तार घडविणे, औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात समन्वय प्रस्थापित करून औद्योगिक विकासाला गती देणे महत्त्वाचे आहे.

३. मराठवाड्याच्या आर्थिक स्थितीवर राज्याचे दरडोई उत्पन्न अवलंबून आहे. मराठवाड्यातील दारिद्र्याचा विचार करता आर्थिक मागासलेपणा, रोजगाराचा अभाव व मागासलेल्या शेतीने येथील दारिद्र्यात वाढ होताना दिसून येते.

४. महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक या त्रिकोणातच औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात होत आहेत. उर्वरित महाराष्ट्रात विशेष: मराठवाड्यात औद्योगिकरणाचा वेग मंद स्वरूपात आहे. पायाभूत सुविधांचा अभाव, भांडवलांची कमतरता, सुव्यवस्थेत नियोजनाचा अभाव इत्यादीमुळे ग्रामीण भागात औद्योगीकरण होत नाही आणि नवीन रोजगार उपलब्ध होत नाही.

५. मराठवाड्यातील जवळजवळ ८० टक्के लोक शेती व शेतीशी निगडित व्यवसायावर उदरनिर्वाह चालतो. मराठवाड्यातील शेतीचे भवितव्य निसर्गाच्या लहरीवर विसंबलेले आहे. जलसिंचनाच्या पुरेसा सुविधा अभावी हा विभाग सातत्याने आवर्षणप्रवण असतो. मराठवाड्यातील ४४ तालुके कायम आवर्षणप्रवण आहेत.

**संदर्भ:**

१. खैरनार दिलीप,२०११, प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड प्रकाशन, पुणे.

२. खांदवे एकनाथ, २००९, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, आरती प्रकाशन, अहमदनगर.

३. दिलीप चव्हाण, मराठवाड्याच्या अस्वस्थतेची पाळमुळं, लोकसत्ता वृत्तपत्र 14 जानेवारी 2025.

४. डॉ. सोमीनाथ घोळवे, मराठवाड्यातील मागासलेपण कधी पुसले जाणार, सकाळ सप्तरंग 17 सप्टेंबर 2020.

५. लोकमत, मराठवाडा आर्थिक मागासलेपणाच्या वाटेवर, 03 नोव्हेंबर 2015.

६. सोमीनाथ घोळवे, मराठवाड्याचे मागासलेपण कधी पुसले जाणार, पाक्षिक द पीपल्स पोस्ट 01 ते 15 सप्टेंबर 2022.

७. निखिल राखोंडे, मराठवाडा विकास संग्रामाची गरज-1, Marathi Podcast on MaTa Gold,०७ जानेवारी, २०२३,

८. उन्हाळे संजीव, ०३ डिसेंबर २०२१, मराठवाड्याचे प्रश्न अजूनही तसेच का राहिले?, BBC News मराठी.